# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली, जि. रत्नागिरी.

आदेश क्र. डॉ.बासाकोकृवि/आस्था/अ--१/०७६८९/२०१७, दिनांक : ३/३/२०१७

**वाचा :--** विद्यापीठ आदेश जा.क्र. BSKKV/EST/A-I/5341/2016, dated 14/06/2016.

## परिपत्रक

विद्यापीठ अधिपत्याखालील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना वितरीत करण्यांत येणाऱ्या Academic Performance Indicators (API) च्या मुल्यांकन तक्त्यांना मान्यता देण्यासाठी विद्यापीठ स्तरावरील मुल्यमापन समिती उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये स्थापन करण्यांत आलेली आहे. सदर समितीची सभा दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी संपन्न झाली. सदर सभेमध्ये घेण्यांत आलेल्या निर्णयानुसार या परिपत्रकान्वये विद्यापीठ अधिपत्याखालील सर्व शिक्षक वर्गीय अधिकारी यांना कळविण्यांत येते की, ज्या शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांनी सन २०१५--२०१६ व त्यापर्वीचे मूल्यमापन तक्ते तयार करणेसाठीचे प्रस्ताव संबंधीत मूल्यमापन समितीकडे सादर केलेले नाहीत, त्यांनी सदरचे प्रस्ताव **दिनांक ३० मार्च, २०१७** पर्यंत सादर करावेत. सदर मूल्यमापन समितीने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांनुसार मूल्यमापन तक्ते तयार करून ते निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयास **दिनांक १५ एप्रिल, २०१७** पर्यंत सादर करावेत. **दिनांक १५ एप्रिल, २०१७** नंतर प्राप्त होणारे मूल्यमापन तक्ते कोणत्याही परिस्थितीमध्ये स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच, सदरचे मुदतीनंतर कोणाही शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना सन २०१५--१६ व त्यापूर्वीचे मूल्यमापन तक्ते वितरीत करण्यांत येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, पुढे असेही कळविण्यांत येते की, संदर्भीय समितीच्या दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेतील ठरावानुसार अंतिम करण्यांत आलेले मूल्यमापन तक्ते स्विकारण्यापूर्वी त्यामध्ये दर्शविण्यांत आलेल्या गुणांची खात्री करून, त्याबाबत सहमतीपत्र देवून मूल्यमापन तक्ते स्विकारण्यांत यावेत. सहमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर मूल्यमापन तक्त्यांमध्ये बदल करावयाचा झाल्यास सदर मूल्यमापन तक्ते बदलून दिले जाणार नाहीत अथवा ते फेर विचारार्थ मूल्यमापन समितीपुढे सादर केले जाणार नाहीत.

प्रस्तूत परिपत्रक विद्यापीठ सेवाहितार्थ निर्गमित करण्यांत येत आहे.

सही/--

**कुलसचिव**

प्रत, माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित --

१. शिक्षण संचालक/संशोधन संचालक/संचालक, विस्तार शिक्षण डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली/मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी/कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली/वनशास्त्र महाविद्यालय, दापोली/काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, रोहा/उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
३. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
४. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत/प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले.
५. प्रभारी अधिकारी (सर्व संशोधन केंद्रे/योजना/विद्यालये)...............................

**२/-- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व शिक्षकवर्गीय अधिकारी यांचे निदर्शनास आणून त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेवनू दप्तरी दाखल करावे. तसेच, सदर सूचनांचे तंतोतंत पालन करणेबाबत आपले स्तरावरून सूचित करावे.**

**सहाय्यक कुलसचिव (प्रशासन --१)**

३/३/१७